CNR No.**MHLA**090018352019 दाखल तारीख: ०३/०७/२०१९

नोंदणी तारीख: ०३/०७/२०१९

निकाल तारीख: १३/०३/२०२६

कालावधी : ०६वर्षे ०८महिने १०दिवस

**सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, उदगीर यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्री.व्ही.आर.घराळ)**

**नियमित दिवाणी दावा क्र.४१०/२०१९**

**निशाणी क्र.३४**

१. डॉ.योगीराज पि.वैजनाथ चिद्रे
वयः ४४ वर्षे, धंदाः वैद्यकीय अधिकारी

२. डॉ.रश्मी पि.रामचंद्र गंदगे
वयः वर्षे, धंदाः
दोघे रा.यशवंत हाऊसिंग सोसायटी,
उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर.

**...वादी**

***विरुद्ध***

१. सुर्यकांत पि.विश्वनाथ आचार्य
वयः ४० वर्षे, धंदाः शेती

२. शिवकांत पि.विश्वनाथ आचार्य
वयः ४५ वर्षे, धंदाः शेती
दोघे रा.संमित्रा कॉलनी, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर

**...प्रतिवादी**

**दावाः कायमचा मनाई हुकूम मिळणेबाबत.**

वादी यांच्यातर्फे विधिज्ञ – श्री.यु.सी.महाजन
प्रतिवादी यांच्यातर्फे विधिज्ञ – श्री.बी.एन.बोळे

## न्यायनिर्णय
## ( दिनांक १३/०३/२०२६ रोजी घोषीत )

वादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या विरुद्ध कायम मनाई मिळण्याकामी दाखल केलेला आहे.

२. दाव्यातील वादी यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः– वादी यांनी उदगीर येथीत मिळकत क्र.५९६५ व ५९६६ या खेरदी घेतलेल्या होत्या. ती मिळकत मुळची सविता संगप्पा भालके यांच्याकडून वादींना आलेली होती. जिचा मुळ सर्वे क्र.३८ असा होता त्या मिळकतीचे बिगर शेती प्रकरण सविता हिने दाखल करून दि.२७/०४/२०११ रोजी आदेश प्राप्त करून घेतला. त्यापैकी प्लॉट क्र.१७ ते २४ हा वादी क्र.१ ने खरेदी केला तर प्लॉट क्र.२५ हा वादी क्र.२ याने खरेदी केला. प्रतिवादी यांनी त्यानंतर दि.१८/०६/२०१९ रोजी काही गुंड लोक सोबत घेऊन कुंपणाची भिंत पाडली व मिळकतीवरती कब्जा करण्याचा प्रयत्न केला. वादी यांनी त्यामुळे पोलिस स्टेशनला जाऊन तक्रार दिली आणि सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्या विरुद्ध दाखल केला.

३. प्रतिवादी क्र.१ व २ यांना समन्स प्राप्त झाल्यावर दाव्याच्या कामी ते उपस्थीत झाले. त्यांनी कोणताही लेखी बयान दाखल केला नाही. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध लेखी बयानाशिवाय दावा चावलण्यात आला. प्रतिवादी यांनी साक्षीदारांचा उलटतपासही घेतला नाही. त्यामुळे त्यांच्यापाशी बचाव नसल्याचा तर्क त्याद्वारे प्राप्त होतो.

४. वादी यांचे विधिज्ञ यांनी युक्तिवाद सादर केला की, वादी हे दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार असून प्रतिवादी त्यांना हरकत व अडथळा करत

असल्याने त्यांना मनाई करण्यात यावी.

५. वादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकल्यावर व केसच्या कामी प्राप्त असणारा पुरावा व कागदपत्रं पडताळून पाहिल्यावर पुढीलप्रमाणे गुण या दाव्याकामी काढण्यात येतात.

| अ.क्र. | गुण | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दावा मिळकतीमध्ये वादी यांना मालकी व वहिवाट आहे ही बाब वादी सिद्ध करतात काय ? | .. | होय. |
| २. | प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये हरकत अडथळा करतात ही बाब वादी सिद्ध करतात काय ? | .. | होय. |
| ३. | वादी यांना प्रतिवादी यांच्या विरुद्ध मनाईचा आदेश मिळण्याचा हक्क आहे काय ? | .. | होय. |
| ४. | आदेश व हुकूमनामा काय ? | .. | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. वादी यांनी या दाव्याच्या कामी आपली बाजु मांडण्यासाठी वादी सा.क्र.१ ने आपली साक्ष नि.क्र.१७ वर नोंदवली आहे. वादी यांनी त्यांच्या हक्कात असणारी खरेदी प्रत नि.क्र.२४ वर पुराव्यात नोंदवली असून ८–अ चा उतारा नि.क्र.२५ वर दाखल आहे. वादी यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीची प्रत नि.क्र.२६ वर आहे. वादीतर्फे वादी सा.क्र.२ रश्मी रामचंद्र गंदगे यांना नि.क्र.१८ वर तपासण्यात आलेले आहे. त्यांच्या पुराव्याद्वारे खरेदीपत्र नि.क्र.३१ वर पुराव्यात नोंदवण्यात आले असून ८–अ चा उतारा नि.क्र.३२ वर नोंदवण्यात आला आहे. वादी यांनी नि.क्र.२७, २८, २९ व ३० वर

कुंपणाच्या भिंतीचे फोटो दाखल केले आहे.

७. **मुद्दा क्र.१ः** वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीची मालकी व वहिवाट त्यांच्याकडे आहे. वादी क्र.१ व २ यांच्या नावावर असणारे खरेदीपत्र नि.क्र.२४ व ३१ आणि ८–अ उतारा नि.क्र.२५ व ३२ जर पाहिले तर दावा मिळकतीमध्ये वादीची असणारी मालकी व कब्जा स्पष्ट होतो. प्रतिवादी यांना त्यांचा पुरावा सादर करण्याविषयी संधी उपलब्ध असताना त्यांनी कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. यावरुन प्रतिवादी यांना कोणताही बचाव उपलब्ध नसल्याचा तर्क प्राप्त होतो. वादीच्या पुराव्यावरून दावा मिळकतीमध्ये वादी यांची असणारी मालकी व कब्जा स्पष्ट होतो. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर होय म्हणून देण्यात येते.

८. **मुद्दा क्र.२ः** वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी यांनी त्यांना दावा मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना दि.१८/०६/२०१९ व दि.२५/०६/२०१९ रोजी दावा मिळकतीमध्ये येऊन मोडतोड केल्याचे दिसून येते. या दाव्याच्या कामी नि.क्र.२७ ते ३० वर दाखल आसणारे फोटो जर पाहिले तर कुंपणाची खीळ पडलेल्या स्थितीत दिसून येते. प्राप्त असणाऱ्या तोंडी पुराव्यावरून प्रतिवादी हे वादीला दावा मिळकतीत हरकत अडथळा करत असल्याचे स्पष्ट होत असल्यामुळे मुद्दा क्र.२ चे उत्तर होय म्हणून देण्यात येते.

९. **मुद्दा क्र.३ः** वादी क्र.१ व २ हे दावा मिळकतीचे मालक आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ यांना कोणत्याही प्रकारे दावा मिळकतीमध्ये मालकी व

कब्जा नसताना त्यांनी कुंपणाची खीळ पाडली असल्याचा तर्क उपलब्ध होतो. वादी हा दावा मिळकतीचा मालक असून त्यांच्या मालकी वहिवाटीला प्रतिवादी हरकत अडथळा करत असल्याने त्याचे व मिळकतीचे नुकसान होत असल्याचे स्पष्ट होते. वादी यांचा दावा मिळकत वहिवाटण्याचा हक्क अबाधीत राहावा म्हणून त्याला मनाई विषयी आदेश मिळणे आवश्यक असल्याचे दिसून येते. त्यामुळे मुद्दा क्र.३ चे उत्तर होय म्हणून देण्यात येते.

१०. वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादी यांच्या विरुद्ध कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादी दावा मिळकतीचे मालक असून मिळकत वहिवाटने त्यांना सहज शक्य व्हावे म्हणून पुढील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतात–

## आदेश

१. वादीचा दावा मंजूर करण्यात येतो.
२. दावा मिळकतीमध्ये वादी क्र.१ व २ यांना प्रतिवादी क्र.१ व २ त्यांचे हस्तक व गुंड यांनी हरकत अडथळा करू नये म्हणून कायम मनाईच्या आदेशाने त्यांना मनाई करण्यात येते.
३. वरीलप्रमाणे हुकूमनामा तयार करण्यात यावा.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.03.13 16:06:27 +0530

उदगीर. (श्री.व्ही.आर.घराळ)
दि.१३/०३/२०२६ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),उदगीर.

**CERTIFICATE**

"I affirm that, the contents of this P. D. F. file of judgment are same word for word as per original judgment."

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | ***Miss L.S.Kendre.*** |
| Name of the Court | : | ***Shri.V.R.Gharal*** |
| | | ***Jt.C.J.J.D. & J.M.F.C., Udgir.*** |
| Judgment Date | : | 13-03-2026 |